Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# शिक्षणाचे राष्ट्रीकरण ही सामाजिक मूलभूत गरज

डॉ. मिलिंद राघो तायडे
भोसंला मिलीटरी कॉलेज नाशिक.



**RESEARCH METHODOLOGY IN SOCIAL SCIENCES:**

*पध्दतीशास्त्रात सामाजिक संशोधन :–*

*संशोधन : सामाजिक संशोधन*

पंचेद्रीय / ज्ञानेद्रिय / पंचमहाभूते यांच्या माध्यमातून हे काय ? ते काय? हे कसे? ते कसे? हे जाणून घेणे म्हणजे संशोधन.

सामाजिक संशोधनाचा हेतू स्पष्ट त्यात समाजाच्या अवनत अवस्थेचे चित्र शोधणे, त्यावरुन अवस्था सुधारण्यासाठी मार्ग शोधणे आणि त्या मार्गाने समाजसुधारण्याचें काम करणे म्हणजे निदान ( कारणं शोधणे ), करणे, उपाय शोधणे, धोरणे ठरविणे आणि अम्मलबजावणी करणे.

संशोधनाच्या योजनेचा एकंदरीने विचार करायचा म्हणजे प्रथम संशोधन म्हणजे काय ते पहायला हवे. माणसामध्ये एक उपजत कुतूहल प्रवृत्ती असते. आपल्या भोवतालच्या जगातील माणसे वस्तू आणि घटना यांचे अस्तित्व माणसाला जेंव्हापासून जाणवायला लागते तेंव्हापासून हे काय आहे, कसे आहे हे आपल्या पंचेद्रियांचा उपयोग करुन जाणून घेण्याची त्याची खटपट सुरु होते. आणि हे जाणून घेणे म्हणजे संशोधन होय. १

*संशोधनाची व्याख्या*

१.वेबस्टरच्या कोषात खालील व्याख्या दिलेली आहे. ''संशोधन म्हणजे तथ्ये (Facts) किंवा तत्वे (Principles) शोधून काढण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सक चौकशी अथवा परिक्षण.

२.भांडारकरांचे मते ''नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिध्दांत पुन्हा तपासून पहाण्यासाठी केलेला सखोल चिकित्सक चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन वर दिलेल्या पहिल्या व्याख्येत आगम पध्दत व दुस-या व्याख्येत निगमन पध्दत निर्देशित केलेली आहे.

३.समाजिक शास्त्राच्या विश्वकोषात दिलेल्या व्याख्येत संशोधन प्रक्रियेचे पैलू दिलेले आहेत.

(अ). सामान्यीकरण्याच्या हेतूने संकल्पना व प्रतीके यांची सहेतुक हाताळणी (Manipulation) करणे.

(ब). प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढवणे, ज्ञानात सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे.

(क). अशा प्रमाणित ज्ञानातून सिध्दांत निर्माण करणे आणि त्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करण्यासाठी तंत्रे विकसित करणे. २

*समाजशास्त्रांतील संशोधन*

(१) हे संशोधन समाज जीवनाशी निगडीत असते.

(२) या संशोधनात सामाजिक आंतरक्रियाचा अभ्यास केला जातो.

(३) विविध सामाजिक घटनांना लागू पडणारे सामान्य नियम शोधले जातात.

(४) या नियमांचे पडताळे पाहून नंतर सामान्यीकरण (Generalization) केले जाते.

(५) हे सामान्य नियम पुन्हा पुन्हा तपासून नंतर सामाजिक सिध्दांत म्हणून मांडले जातात. याच सिध्दांताच्या आधारे नवीन घटनांचा अभ्यास केला जातो.

(६) या पध्दतीने मिळवलेले ज्ञान सामाजिक समस्या सोडविण्यासाठी वापरले जाते. ३

*सामाजिक संशोधनाची उद्दिष्टै*

संशोधन हाती घेण्यात माणसांचे काही हेतू असतात. व त्या त्या हेतूनुसार संशोधनाचे स्वरुप असते.

(१)जेंव्हा एखाद्या क्षेत्रात आधीची कोणत्याच प्रकारची माहिती उपलब्ध नसते तेंव्हा संशोधकाला चाचपडत जाण्याची पाळी येते. त्या संशोधनाला अन्वेषणात्मक (Exploratory) संशोधन म्हणतात.

(२) ज्या संशोधनात वस्तू, व्यक्ती व घटना यांचे यथातथ्य वर्णन करावयाचे असते त्या संशोधनाला वर्णनात्क (Descriptive) संशोधन म्हणतात.

(३) जेव्हा दोन घटना जोडीने घडतात. तेंव्हा या घटनेची वारंवारिता (Frequencey) तपासून पहाण्यासाठी जे संशोधन करतात त्याला निदानात्मक (Diagnostic) संशोधन म्हणतात.

(४) आणि जेंव्हा दोन तथ्यातील कारण – परिणाम किंवा सहसंबंध तपासून पहायचा असतो त्याला गृहीतकृत्याच्या चाचणीचे स्वरुप असलेले संशाधन म्हणतात. ४

''या विषयाच्या अभ्यासाने माझ्या समाजाच्या अवनत अवस्थेचे चित्र दिसेल, मार्ग सापडेल व या मार्गाने समाजसुधारणेचे काम करीन.'' – डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

बडोदे सरकारातील घडलेल्या सर्व घटना सयाजीराव महाराजांना ज्ञात होत्याच. २ फेब्रुवारी १९१३ साली रामजी सुभेदाराचा झालेला मृत्यु हया सर्व बाबींचा विचार करुन भीमरावाची उच्च शिक्षणाची उत्कट इच्छा पाहून त्यांनी भीमरावाला बोलावून घेतले व विचारले ''तुला कोणत्या विषयाचा अभ्यास करावा असे वाटते''. त्यावर तरुण भीमराव म्हणाले, ''समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि विशेषतः

सार्वजनिक अर्थकारण''. नंतर महाराज म्हणाले,''या विषयाचा अभ्यास करुन तू काय काय करशील पुढे'', त्यावर भीमरावाने निर्भयपणे उत्तर दिले,'' या विषयाच्या अभ्यासाने माइया समाजाच्या अवनत अवस्थेचे चित्र दिसेल, मार्ग सापडेल व या मार्गाने समाजसुधारणेचे काम करीन'' ५, अशा प्रकारे बाबासाहेब हयांनी आपल्या समाजाच्या अवनत अवस्था शोधून उपाययोजना करण्यासाठी शिक्षण घेतले.


## *सारांश* / Abstract

शिक्षणबंदी / ज्ञानबंदी ....... रोजगार बंदी........ आरक्षण बंदी ही आव्हाने पेलण्यासाठी – आवाहन आणि अपेक्षित.

यासाठी प्रत्येकाने सनदशिर मार्गाने, संविधानिक मार्गाने – जो राजमार्ग आहे – जो बाबासाहेबांचा मार्ग आहे. या मार्गाने शिका, चेतवा आणि संधटित व्हा. म्कनबंजम ।हपजंजम ंदक वतहंदप्रम प्रहरी, संरक्षक, कर्तव्यदक्ष, जबाबदार जागृत होऊन, इतरांना जागृत करणे आवश्यक आहे.



## *मूळ शब्द* / keywords

शिक्षण, उच्च, तंत्र, विज्ञान, Medical, Engineering, Managment, ज्ञानबंदी , रोजगार बंदी, शिक्षणाचे राष्ट्रीकरण


## *प्रास्ताविक*

शिक्षण हे शासनाकडेच असले पाहिजे, शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपितवा कामा नये असे मत आणि दृष्टीकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. स्थानिक स्वराज्य संस्थांचा अनागोंदी कारभार आणि गांभिर्याबाबत बाबासाहेबांनी स्पष्ट केलेले होते. सद्यस्थितीतशिक्षण शासन स्वतःकडे तर ठेवू इच्छित नाहीच नाही. एवढेच नव्हे तर स्थानिक स्वराज्य संस्था देखिल (जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका) अशैक्षणिक वातावरण, दुषित शैक्षणिक वातावरणाकडे डोळेझाक करून गरिबांचे शैक्षणिक कुपोषण करित आहे. उच्च, तंत्र, विज्ञान MEM म्हणजे Medical Engineering Managment चे शिक्षणाचे खाजगीकरणाव्दारे व्यापारीकरण, बाजारीकरण होत आहे त्यामुळे या मेमच्या शिक्षणापासून गरिब – वंचित आहेत. यांत आरक्षण नसल्यामुळे आरक्षणधारी उच्च-तंत्र-विज्ञान आणि MEM च्या शिक्षणाला वंचित होण्याची लक्षणे दिसत आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून शासनाने 'शिक्षण' प्रशासनाकडेच ठेवण्यासाठी सर्वांना म्हणजे सर्व देशवासियांना योग्य व उचित न्याय (न्याय्य शिक्षण) मिळण्यासाठी शिक्षणाचे राष्ट्रीकरण होणे ही मूलभूत गरज आहे.

## *सद्यस्थिती :– संविधानिक तरतुदींचे उल्लंघन करून 80%– 85% लोकांच्या शिक्षणाच्या मूळावर घावं*

मानवी जीवनात मानवाच्या गरजांना तीन प्रकारात विभागणी केली जाते. १) आवश्यक /मूलभूत गरजा, २) दुय्यम गरजा, ३) चैनीच्या गरजा. पूर्वी अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मुलभूत गरजा होत्या . सद्यस्थितीत अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांत औषधोपचार आणि शिक्षण यांचा अंतर्भाव केला जातो. वास्तविक शिक्षण ही जशी मूलभूत गरज आहे.तसेच शिक्षण हे सर्व प्रकारचे विकासाचे मूळ स्त्रोत आणि साधन आहे. देशातील सर्व जनतेची शिक्षण ही मुलभूत गरज भागविण्यासाठी शिक्षण देशाच्या मालकीचे आणि अखत्यारीचे होण्यासाठी शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण होणे अत्यावश्यक आहे.

देशांतील सामुदायिक शेती तसेच जमिनीचे, विम्याचे व उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे या माध्यमातूनच आर्थिक समानता प्रस्थापित होईल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

व्यक्तीच्या विकासासाठी तसेच कुटूंब, समाज, देश किंबहूना जागतीक विकासासाठी शिक्षण ही बाब शासनाच्या अखत्यारीत असणे आवश्यक आहे. म्हणून शिक्षणाचे ्रीयीकरण ही मूलभूत गरज आहे. सद्यस्थितीत प्राथमिक शिक्षणापासुन ते उच्च तंत्र, व्यावसायिक अशा सर्व प्रकारच्या आणि टप्प्यावरिल शिक्षणाचे बाजारीकरण न करून व्यक्तीपासून ते संपुर्ण देशाच्या विकासासाठी अत्यावश्यक / मूलभूत गरज म्हणून शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण होणे ही काळाची गरज आहे.

प्राथमिक शिक्षणात संविधानिक तरतूदीनुसार आरक्षण नाही. प्राथमिक शिक्षणाच्या हक्काच्या कायद्याने संविधानिक १५(४) आणि ३३५ कलमांचे उल्लंधन होत आहे.६ संविधानिक तरतूदीनुसारचं आरक्षण हवे.

- प्राथमिक शिक्षण राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असतो त्याचप्रमाणे व्यक्तीगत, कौटुंबिक आणि सामाजिक विकासाचा पाया असतो.७
- माध्यमिक – उच्च माध्यमिक शिक्षण – १६८० पासुन विना अनुदान तत्व – संविधानिक तरतूदीचे पालन नाही. पुन्हा १५(४) आणि ३३५ कलमांचे उल्लंधन.८
- उच्च तंत्र आणि व्यावसायिक शिक्षण यांत व इतर (वैद्यकिय, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापकीय शिक्षण) यांचे अभिमत विद्यापीठे यांच्या माध्यमातून १६६० पासुन छुपे शिक्षणाचे खाजगीकरण पुन्हा १५(४) आणि ३३५ कलमांचे उल्लंधन.६
- २००२ मध्ये शिक्षणक्षेत्रात खाजगी विदेशी गुंतवणूकीला मान्यता – यात देखील खाजगीकरणाला उत्तेजन. पुन्हा १५(४) आणि ३३५ कलमांचे उल्लंधन.१०
- २००६ पदव्युत्तर वैद्यकिय (P.G. Medical) शिक्षणात आरक्षण नाही. सर्वोच्च न्यायालयाचा आकसपूर्ण निर्णय. (नवी दिल्ली पी.टी. आय. ३ डिसेंबर २००६, लोकसत्ता, नवभारत टाईम्स, इंडियन एक्सप्रेस ४ डिसें. २००६)यात देखील १५(४) आणि ३३५ कलमांचे उल्लंधन११.
- २०१० मध्ये विदेशी विद्यापीठांना प्रवेश देतांना आरक्षण लागू असणार नाही ही संविधानिक तरतूदी विरूध्द भूमिका (लोकसभेत बील पास, राज्यसभेत बाकी) यात देखील १५(४) आणि ३३५ कलमाचे उल्लंधन.१२
- २०११ मध्ये प्रस्तावित शुल्क नियंत्रण कायदा यात पूर्व-प्राथमिक – माध्यमिक शिक्षणाची फी वाढीच्या तरतुदी. संस्थाचालकांच्या हाती कोलीत देवून गरीब, मध्यमवर्गीयांना एक प्रकारे 'ज्ञानबंदी' करणे चालु आहे.
- केंद्र सरकारची दुटप्पी भूमिका – प्रथम ४४ अभिमत विद्यापीठांची मान्यता रद्द करावी म्हणून सर्वोच्च न्यायालयात जायचे नंतर काही काळातच धुमजाव करत या अभिमत विद्यापीठांच्या मान्यतेबाबत पुर्नविचार शासन करित आहे असे ११ जानेवारी २०११ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करणे.

- शासन शिक्षणाच्या हक्काबाबत कायदा करते त्याला खाजगी शिक्षणसंस्था न्यायालयात आव्हान देतात. सर्वोच्च न्यायालय त्यांना तंबी देते (दि. २५ फेब्रुवारी २०११) प्रत्यक्ष गरिबांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. गरिबांना शिक्षण विकत घेणे शक्य नाही. संविधानात शिक्षण हा मूलभूत अधिकार असे नमूद करूनही शिक्षण घेण्यासाठी फी द्यावी लागते आणि ती शुल्क नियंत्रीत करण्यासाठी कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ रद्द करण्याची शिफारस या अधिनियमाच्या आधारे करण्याचे धारि शासनाने करणे म्हणजे पुन्हा कॅपिटेशन फी घेण्याची वृत्ती राजरोसपणे घेण्यास मूभा देणे असे होईल. काही तथाकथित तज्ञ मंडळी शुल्क नियंत्रणाबाबतच्या प्रस्तावित कायद्याच्या मसुद्यात चर्चा व सुधारणा करताना, आंध्र प्रदेशच्या फी सिलिंगचा मुद्दा लूवन धरतात. याचा दुसरा अर्थ फी वाढ आणि मर्यादा आपणच ठरवून देणे म्हणजे 'आ बैल मुझे मार'! अर्थात गरिब-मध्यमवर्गीयांच्या म्हणजेच ८०%-८५ः लोकांच्या शिक्षणाच्या मुळावर धाव धालण्यासारखे आहे. हे केंद्र - राज्य या दोन्ही सरकारचे धोरण अयोग्य असून देशाच्या सर्वांगिण विकासाला बाधक आहे.
- १९७६ मध्ये ४२ वी धटना दुरूस्ती करून, संविधानाच्या प्रस्ताविकेत 'समाजवादी' शब्दप्रयोग करण्यात आला. वस्तुस्थिती विपरीत आहे. समाजवादी आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना संविधानातच आणि कागदावरच राहिली आहे.१३

### *'मनू' च्या जागी 'मनी'*

मनूच्या धर्मसत्तेपासून अनेक राजे, राजसत्ता, ब्रिटीश सत्ता ते स्वातंत्र्य मिळालेल्या भारतातील कॉंग्रेस, भाजपा या सर्व सत्ता प्रवासात सत्तांतर होत गेले. दलितांच्या शिक्षणाची कधी उपनयन, संस्कार नाही म्हणून ज्ञानबंदी होती तर कधी हेतूतः दूर्लक्ष करून ज्ञानबंदी. सद्यस्थिती आणि आगामी काळ म्हणजे मनी राज पैसा फेक तमाशा देख असे असण्याची चिन्हे दिसत आहेत. या सत्तांतर प्रवासात तुलनात्मक अध्ययन केले असता, डह. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटीश राजवटीत दलितांना कसे शिक्षणापासून वंचित ठेवले हे दाखविले. त्याच बरोबर दलितांच्या उन्नतीसाठी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च-तंत्र-विज्ञान व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षणाची वेगवेगळया ठिकाणी कशी सोय होऊ शकते हे ब्रिटीश सरकारला निवेदन देऊन स्पष्ट केले आहे.

सद्यस्थितीत दलित, मागासवर्ग समाज हा दलित- ब्राह्मण - पांढरपेशा होत चालला आहे. सामाजिक बांधिलकी बाबतउदासिन, स्वार्थी, कुटुंबापुरते संकुचित वागण्यामुळे गाफिल झाला आहे. त्यामुळे त्याच्या येणाऱ्या पिढीला ज्ञानबंदी ला सामोरी जावे लागेल. कारण मनू म्हणजे ची जागा मनी म्हणजे पैशाने घेण्याची लक्षणे दिसत आहेत.

ब्राह्मणाचा मुलगा, मग तो उडाणटप्पू का असेना, शिकण्याचा व शिकविण्याचा किंवा दान दक्षिणा स्वीकारण्याचा हक्क कोणी हिरावू धेवू शकत नव्हते. या उलट, तथाकथित खालच्या जातीतील व्यक्तीला, ती कितीही बुध्दिमान असली तरी, शारीरिक श्रमाची हलकी कामेच करीत आपले आयुष्य कंठावे लागत असे. शिवाय मुळातच शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे अशी बुध्दिमत्ता सिध्द करण्याचा मार्गही खुंटलेला होता.१४

आपण दक्षिण अफ्रिकेतील भेदभावाबद्दल इतके बोलत असताना आपल्याला याचे भान असते का, की आपल्या इथे प्रत्येक खेडयात एक दक्षिण आफ्रिका आहे? ही वस्तुस्थिती आहे. जाऊन पहा म्हणजे कळेल.१५ एवढेच नाहीतर आपण अनुभवत आहोत. प्रत्येक मनुष्य हा दक्षिण आफ्रिका आहे पुढे या मनूच्या जागी, दक्षिण आफ्रिकेच्या जागी खेडयापाडयात शहरात मनीव्दारा दक्षिण आफ्रिकेतील भेदभाव अधिकृत होईल. कारण मनी असणारांना शिक्षण उच्च शिक्षण तंत्र-विज्ञान-व्यावसायिक शिक्षण इतर मनीविना या शिक्षणाला वंचीत होतील अशी परिस्थिती निर्माण होईल. या भेदभावाला वेळीच आवर धालण्यासाठी सर्वांना शिक्षणाची त्यातल्या त्यात सर्व शिक्षणाची संधी मिळण्यासाठी देशाच्या मालकीचे शिक्षण व्हायला पाहिजे. शिक्षणाचे राृयीकरण व्हायला पाहिजे.

शिक्षणावर प्रांतिक सरकारचाच ताबा असणे इ व अवश्य आहे.

राष्ट्रीय शिक्षणाचे धोरण ठरवा १६

स्थानिक स्वराज्य संस्थांचा बेशिस्त कारभार चव्हाटयावर आला आहे.१७ एकुण १३० अभिमत विद्यापीठे.१८ यापैकी ४४ अभिमत, १६ विना अनुदान संस्था वगैरे. त्यांचे अधिकार काढून धेणेही सरकारला भाग पडले आहे. ४४ दर्जाहीन अभिमत २१ खोटया आणि बोगस संस्था आणि विद्यापीठे सद्यस्थिती आहेत. २०

शिक्षणाच्या कारभारात अंदाधूंदी माजल्याने नवीन पिढीचे नुकसान होईल. हा भेद केव्हाही विसरता कामा नये२१

१५(४) - शिक्षण प्रवेश ३३५ सेवा आणि पदे संविधानिक कलमांचे उल्लंधन सध्या शिक्षणामध्ये आरक्षण नाही हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय याचेच द्योतक आहे.२२

६ प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची जबाबदारी ही सरकारवरच असणे जरूर आहे.२३

ज्या लोकल बोर्डाच्या व म्युनिसिपालट्यांमध्ये शिक्षणात पुढारलेल्या लोकांचा भरणा विशेष असतो त्यांना सक्तीच्या शिक्षणाविषयी अगत्यच वाटत नाही. अतिव कळवळा कारणं. १) सक्ती शिवाय त्यांच्या जातींमध्ये शिक्षण प्रसार होत असतो. ते पैसा असल्यामुळे शिक्षण विकत धेतात. २) मुद्दाम शिक्षण देवून आपल्या सामाजिक वर्चस्वावर ते मुद्दाम कशाला कुऱ्हाड धालून धेतील?२४

प्रवेश - डोनेशन पासून ते इतर सेवा पदे भरण्यात त्यांना बक्कळ पैसा कमवता येतो - एकप्रकारे पैशाचे कुरणच आहे. अशाप्रकारे पूर्वी आणि आता यात विशेष फरक दिसत नाही.

सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हा तूटक-तूटक रितीने सोडविण्याचा प्रश्न नव्हे तो एकसुत्री धोरणानेच सोडविण्यात आला पाहिजे.२५

वस्तुस्थिती काही वेगळीच आहे.

एकूण लोकसंख्येच्या ७४.५६ आरक्षणधाऱ्यांना ५२ आरक्षण मिळते हे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा २२.५६ कमी आहे. तथाकथित सवर्ण संवर्ग २५.४४ लोकसंख्येत आहे. त्यांना १०० पैकी ५२ आरक्षण गेल्यावर उर्वरित ४८ छुपे आरक्षण मिळते. म्हणजे सवर्ण संवर्गास त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्तीचे २२.५६ आरक्षण मिळते.एकूण लोकसंख्येच्या ७४.५६ लोकसंख्या असलेल्या आरक्षणधारी सर्व संवर्गाना केवळ ५२ आरक्षण मिळणे म्हणजे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा २२.५६ कमी आरक्षण मिळते ही वस्तूस्थिती किंवा फॅक्ट ॲन्ड फिगर्स समोर असतांना आरक्षणाबाबत तथाकथित मिडिया -प्रचार - प्रसार माध्यमे, सर्वोच्च न्यायालये, सरकार (छुप्या पध्दतीने विरोधी पक्ष) आकस मनात बाळगून आहेत. याचा प्रत्यय आणि अनुभव सद्यस्थितीत हा मनूवादी वर्ग आरक्षणधाऱ्याच्या उच्च शिक्षणाच्या यात 'मेम' म्हणजे मेडिकल, इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट तसेच इतर व्यावसायिक शिक्षणाच्या मूळावर धावं धालण्यासाठी सज्ज आहे, कार्यरत आहे.

### *निष्कर्ष*

१. वंचितांना शिक्षणापासून वंचितीकरणामुळे अपाय आणि अनेक प्रकारच्या विषमता निर्मितीला शिक्षण कारणीभूत.
२. संविधानिक तरतुदींचे उल्लंधन करून ८०% - ८५% लोकांच्या शिक्षणाच्या मूळावर धावं
३. देशातील सर्व शिक्षणाची स्थिती बाजारीकरण आणि काळ्या बाजाराची अत्यंत गंभीर व दयनीय आहे.
४. प्राथमिक शिक्षणाचा हक्क / अधिकाराची संविधानिक तरतुद करून शिक्षण मुलभूत हक्कात समावेश करावयाचा आणि आरक्षणधाऱ्यांच्या संविधानिक प्रतिनिधित्वाच्या विरोधात भूमिका घ्यावयाची ? का ? २५ गरिबांच्या मुलांना आरक्षण हा शिक्षणाचा हक्क देणे हे अयोग्य आहे.
५. माध्यमिक - उच्च माध्यमिक कायम विनाअनुदानीत आणि विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण अंमलबजावणी नाही - शिक्षणासाठी फी द्यावी लागते. सेवा व पदे आरक्षणानुसार भरली जात नाहीत.
६. उच्च-तंत्र आणि व्यावसायिक शिक्षण अभिमत विद्यापीठांच्या अखत्यारित तसेच विनाअनुदानीत शैक्षणिक संस्थांच्या अखत्यारीत असलेले आरक्षण धोरण शिक्षणाबाबत तसेच सेवा व पदांबाबत राबविले जात नाही.
७. न्यायालये संविधानिक तरतुदीनुसार आरक्षण धोरण राबविण्याबाबत आग्रही नाहीत. उदा. पदव्युत्तर वैद्यकिय शिक्षणात आरक्षण नाही हा सर्वोच्च न्यायालयाचा आकसपूर्ण निर्णय.
८. विदेशी विद्यापीठांमध्ये आरक्षण असणार नाही ही शासनाची संविधानाविरोधात भूमिका योग्य नाही.
सद्यस्थितीतील शिक्षणातील आव्हाने, आवाहने आणि अपेक्षित.

शिक्षणबंदी / ज्ञानबंदी ....... रोजगार बंदी........ आरक्षण बंदी ही आव्हाने पेलण्यासाठी - आवाहन आणि अपेक्षित.

यासाठी प्रत्येकाने सनदशिर मार्गाने, संविधानिक मार्गाने - जो राजमार्ग आहे - जो बाबासाहेबांचा मार्ग आहे. या मार्गाने शिका, चेतवा आणि संधटित व्हा. Educate Agitate and organize प्रहरी, संरक्षक, कर्तव्यदक्ष, जबाबदार जागृत होऊन, इतरांना जागृत करणे आवश्यक आहे.

१.प्रथम - शिक्षणाचे आरक्षण प्रत्येक स्तरावर मागणी करणे अपेक्षित आहे. Jr.KG to PG & MEM व इतर व्यावसायिक तांत्रिक शिक्षणात
२.शिक्षण देणाऱ्या संस्था - देशी असो वा विदेशी त्यांना संविधानीक तरतूदींनुसारच या देशात कार्य करावे लागेल ही आग्रही भूमिका.
३. शिक्षणाचे राष्ट्रीयकरण व्हावे - या मागणीत सर्वांना शिक्षण - सर्वांना समान दर्जाचे शिक्षण अपेक्षित.
यासाठी कृती कार्यक्रम Action Programme म्हणजे कोणी काय करावे?
*1 राजकीय पक्ष* –आपल्या अजेंडयात शिक्षणाला अग्रक्रम द्यावा. त्यानुसार सर्वस्तरावर आवाज उठवावा, सभा, संमेलने,मेळावे, मोर्च शिक्षणासाठीच घ्यावेत. (बाबासाहेब म्हणायचे राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय हाती येणार नाही...) तसेच (शिक्षणाशिवाय संधटन म्हणजे विधटनच.... जे सद्या वस्तूस्थिती आहे.)
२. वकील, डॉक्टर, इंजिनिअर्स, व्यवस्थापक वगैरे मंडळींनी जनहितार्थ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करणे. जनजागृती करून लार्जर बेंचव्दारा संविधानिक तरतूदी लागू होण्यासाठी सभा-संमेलने धेणे आणि शासनाकडे मागणी करणे. संविधानिक तरतूदींची अंमलबजावणीसाठी आग्रही भूमिका एकत्र येवून करणे.
३. सामाजिक संधटना - संविधानिक तरतूदींची अंमलबजावणीसाठी जन आंदोलने मोर्च, सभा, संमेलने धेणे.
४. नोकरदार - कर्मचारी संधटना - एकत्रीत सभा संमेलने धेणे, जागृती धडवून आणणे
५. विद्याथी - विद्यार्थी संधटना - उच्च शिक्षणाच्या अधिकाराकरीता कोणताही त्याग करू (डह. बाबासाहेब आंबेडकर) आणि माऱ्याच्या जागा काबीज करू. हे लक्ष समोरठेवू अभ्यास करणे. अभ्यासक्रमापासून प्रवेश फी, शिष्यवृत्ती इत्यादी बाबत जागृती करणे. उच्च-तंत्र-व्यावसायिक शिक्षण संपादन करणेसाठी अभ्यासूवृत्ती कायम ठेवून जनजागृती करणे. (प्रत्यक्ष राजकारणात भाग धेऊ नये - डह. बाबासाहेब आंबेडकर)
६. धार्मिक संधटना - शिक्षण परिषदा धेणे
७. चळवळीचे पंख वर्तमान पत्रे - मिडिया यांनी ज्वलंत प्रश्न शिक्षण याला प्राधान्य क्रमाने प्रसिध्दी देणे- जनजागृती करणे चेतविण्याचे म्हसपसंजम काम करणे.
८. न्यायालये - संविधानिक तरतूदींचे उल्लंधन होणार नाही याची काळजी धेणे. संविधानिक तरतूदींची अंमलबजावणीसाठी आग्रही राहणे. आकसपूर्ण निर्णय देवू नये. (सर्वोच्च न्यायालय - पदव्युत्तर वैद्यकिय शिक्षणाबाबत)
९. महिलांकडून अपेक्षा- जिच्या हाती पाळण्याची दोरी ..... महिलांच्या प्रगतीवरून मी समाजाची प्रगती मोजतो असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांप्रती मूल्यमापन करण्याबाबतचे मत होते. महिलांनी जनजागृती करावी. स्वतः उच्चशिक्षित होऊन कुटुंबाला उच्चशिक्षित करावे ही अपेक्षा.
१०. शासनाकडून अपेक्षा उपाय - शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करावे
शासनाची शिक्षण ही मूलभूत जबाबदारी आहे.
१. देशातील प्रत्येक नागरिकाला शिक्षण द्यावे.
२. शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.
३. समान दर्जाचे शिक्षण द्यावे.

*संदर्भ :–*

१.इंगोले यु.पी. २००२ फुले शाहू आंबेडकर शैक्षणिक क्रांती, आशिष प्रकाशन, यवतमाळ पा.नं. ६२
२.बेहेरे सुमन १९९८ सामाजिक संशोधन पध्दती, विद्या प्रकाशन, नागपूर पा.नं. २-७
३. उपरोक्त २
४. उपरोक्त २
५. उपरोक्त २
६.मिलिंद धाम्मिक -संविधानात तरतूदी आणि न्यायालयीन निर्णय. त्रिरश्मी विचार प्रकाशन, नाशिक ६ मे २००६. पान नं. ७,२०.?
७.डॉ. मिलिंद-शिक्षणाचा पोकळ अधिकार नको. प्राथमिक शिक्षण राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. त्रिरश्मी विचार प्रकाशन, नाशिक १३/१०/२०१० पान नं. १०,२७.
८.डॉ. मिलिंद तायडे-विना अनुदान शैक्षणिक धोरण म्हणजे फसवणूकीचे दुचक्र.आकाशदीप दीपावली विशेषांक, नाशिक २०१० पान नं.

४३-४७.
६.डॉ. मिलिंद-अभिमत विद्यापीठे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून उच्च व दर्जात्मक शिक्षणापासुन वंचितांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र. त्रिरश्मी विचार प्रकाशन, नाशिक.पान नं.२
१०.उपरोक्त - ४४ - पान नं. ३,४,५
११.उपरोक्त - ४४ - पान नं. १०.
१२.डॉ. मिलिंद-विदेशी विद्यापीठाच्या माध्यमातून आरक्षणधाऱ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र. त्रिरश्मी विचार प्रकाशन, नाशिक ६ मे २००६. पान नं. २.
१३.डॉ. मिलिंद तायडे-सामाजिक न्याय तत्व-आरक्षण धोरण विश्वसम्राट, मुंबई ३०/७ ते ४/८/२००७.
१४.उपरोक्त - ७ - पान नं. ६७.
१५.उपरोक्त - ७ - पान नं. ८६.
१६.उपरोक्त - १७ - पान नं. ८४
१७.उपरोक्त - १७ - पान नं. १००
१८.विद्यापीठ अनुदान आयोग वेबसाईड
१९.उपरोक्त -५३
२०.उपरोक्त- ५३
२१.उपरोक्त - १७ - पान नं.१००
२२.डॉ. मिलिंद तायडे - सर्वोच्च न्यायालयाचा आकसपूर्ण निर्णय विश्वलिडर मासिक जाने.२०१०.पा.नं.१०
२३. उपरोक्त - १७ - पान नं. १००
२४.उपरोक्त - १७ - पान नं.१००
२५.उपरोक्त - १७ - पान नं.१००



डॉ. मिलिंद राघो तायडे
भोसंला मिलीटरी कॉलेज नाशिक.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org